दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२७ ऑक्टोबर २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 27 Oct 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 67 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सर्वांचे योगदान आवश्यक-एकनाथ शिंदे

## आळंदीत उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे (वृत्तसंस्था)**

आळंदी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी एकत्र येऊन कार्य करावे, असे निर्देश दिले. हे कार्य केवळ पर्यावरण संवर्धनाचे नसून श्रद्धेचे प्रतीक असल्याने प्रत्येक नागरिकाने यात योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.देहू आणि आळंदी ही महाराष्ट्राची प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत. या तीर्थ क्षेत्रातून वाहणारी इंद्रायणी नदी भाविकांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे नदी प्रदूषणमुक्त करण्याचा शासनाचा संकल्प असून, या प्रकल्पासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. आळंदी नगरपरिषदेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत या विकासकामांचे भूमिपूजन व शुभारंभ झाला. या कार्यक्रमाला मराठी भाषा मंत्री उदय सामंत, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार बाबाजी काळे, आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर आणि श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मुख्य विश्वस्त योगी निरंजननाथ उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महाराष्ट्र ही संतांची आणि शूरवीरांची भूमी असल्याचे नमूद केले. वारकऱ्यांच्या हितासाठी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यामध्ये वारकरी भवन उभारणी, दिंड्यांसाठी अनुदान आणि वारकरी विमा योजना यांचा समावेश आहे. मंदिरांना संस्कार केंद्र मानून 'ब' वर्ग



तीर्थक्षेत्रांसाठीचा निधी दोन कोटींवरून पाच कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. कार्तिकी वारीपूर्वी रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याच्या सूचना देऊन, यासाठी नगरविकास विभागामार्फत एक कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. शासन वारकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून धर्म, प्रथा आणि परंपरांचा आदर करते. भागवत धर्माची पताका उंच ठेवण्याचे कार्य शासन करत असल्याचेही ते म्हणाले.

आळंदी येथील 'ज्ञानपीठ' स्थापनेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठवला असून, त्याचा पाठपुरावा सुरू आहे. गोमातेला 'राज्य माते'चा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. आळंदी पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तातडीने मान्यतेसाठी पाठवून हा प्रकल्प लवकर मार्गी लावण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले. तसेच, रुग्ण तपासणी केंद्राच्या माध्यमातून वारकऱ्यांची सेवा करावी आणि भक्तनिवासाचे काम तातडीने सुरू करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.मंत्री उदय सामंत यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त ज्ञानेश्वरी पारायण ग्रंथाच्या छपाईसाठी मराठी भाषा विभागामार्फत एक कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचे सांगितले. हा प्रकल्प केवळ तीन महिन्यांत पूर्ण करण्यात आला असून, पारायण प्रत केवळ ५० रुपयांत उपलब्ध होणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# डॉ.संपदा मुंडे यांच्या हत्येचा बीड शहर बचाव मंचाच्या वतीने तीव्र निषेध

### प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा व पाच कोटी कुटुंबाला आर्थिक मदत द्या नितीन जायभाये

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

खाकीतील सैतानांनी सावित्रीबाई फुले यांच्या लेकीला छळ करून अशा पद्धतीने संपवून महाराष्ट्राच्या अस्मितेला काळीमा फासली... शाहू, फुले,आंबेडकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या महाराष्ट्रात प्रशासनातून व खाकीतूनच सैतान जन्माला येतोय... बीड शहर बचाव मंचाच्या वतीने डॉ. संपदा मुंडे यांना आदरांजली व आदरपूर्वक श्रद्धांजली वाहण्यात येत असून खाकीतील सैतान व त्यांच्यासोबत असणारे सर्व अधिकारी यांचा तीव्र निषेध करण्यात येत आहे. आज हा निषेध नोंदवण्यासाठी भाषेच्या कोषात शब्द कमी पडत आहेत.डॉ.संपदा मुंडे या गरीब घरातल्या एक शेतकरी कन्या होत्या. आई-वडिलांनी कर्जे काढून काढून मुलीचे शिक्षण पूर्ण केलं होतं.मुलगी उच्च शिक्षित झाली होती. नुकतीच कुठं त्याची चिमुकल्याच्या आयुष्याची नवीन सुरुवात झाली होती.



आपल्या शेतकरी आई वडिलांसाठी डोळ्यात हजारो स्वप्न होते.आपल्या गरीब शेतकरी कुटुंबाचे कर्ज फिटणार होते. या उच्च शिक्षित डॉक्टर कन्येच्या रूपाने या गरीब शेतकरी कुटुंबाच्या स्वप्नांना पंख मिळणार होते. आता कुठ या महाराष्ट्राच्या लेकीसाठी एक समृद्ध आयुष्य समोर हात जोडून उभा ठाकून स्वागत करत होतं. अशातच पोलिसी खाकीतील, प्रशासनातील अधिकारी व यात नंतर सहभागी झालेले लोकप्रतिनिधीच्या वेशातील सैतान यांची वाईट नजर तिच्यावर पडली. तिच्यावर मानसिक दबाव आणत तिला ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रकार सुरू झाला. या पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात, महाराष्ट्राच्या अस्मितेला काळीमा फासण्याचा काळा अध्याय सुरू झाला. आणि रक्षकच बनला भक्षक. या प्रकरणात असलेले खासदार, आमदार व त्याचे पी.ए.राजकीय नेते यांची देखील कसून तपासणी करून त्यांना देखील या प्रकरणात सह आरोपी करावे अशी मागणी बीड शहर बचाव मंचच्या वतीने करण्यात आली आहे. लवकरच या प्रकरणावर बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रात आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती नितीन जायभाय यांनी पत्रकातून सांगितले आहे.

# राज्य शासनाच्या दुर्गोत्सवात सोहम मोरेचा सहभाग मुख्यमंत्र्याच्या सहीचे सोहमला मिळाले प्रमाणपत्र

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मसेवाडी येथील अशोक मोरे ( सर) यांचा मुलगा चि. सोहम अशोक मोरे याने महाराष्ट्र शासनाच्या दुर्गोत्सव -२०२५ मध्ये सहभाग घेऊन सिंधुदुर्ग किल्ला बनविला.

त्याबद्दल त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहीचे प्रमाण पत्र प्रदान करण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र शासनाच्या अविरत प्रयत्नांमुळे शिवछत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष असलेल्या बारा दुर्गांना जागतिक वारसा वास्तू म्हणून वैश्विक ख्याती मिळालेली आहे. या अनुषंगाने राजे शिवछत्रपतींना मानवंदना प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने दुर्गोत्सव -२०२५ चेआयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाने आयोजित करण्यात आलेल्या या दुर्गोत्सव २०२५ मध्ये



बीड तालुक्यातील मसेवाडी येथील अशोक मोरे सर यांचा मुलगा चि. सोहम याने सहभाग घेऊन सिंधुदुर्ग किल्ला बनविला. या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या जतन व संवर्धन मोहिमे मध्ये सहभागी होऊन योगदान दिले. त्याबद्दल त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहीचे प्रमाण पत्र प्रदान करण्यात आले आहे. सोहम मोरे याने बनविलेला सिंधुदुर्ग किल्ला पाहुन मसेवाडी येथील ग्रामस्थ आश्चर्यचकित झाले होते. मसेवाडी गावचे संरपच, उपसरपंच यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी सोहमचे कौतुक केले. सध्या सोहमचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# न्याय मिळण्यासाठी मुंडे कुटुंबियांच्या पाठीशी:आ.धस

**दैनिक वादळ वार्ता**
**आष्टी । प्रतिनिधी**

:बीड जिल्ह्यातील कोठरबन येथील अल्पभूधारक शेतकरी असणाऱ्या मुंडे कुटुंबीयांनी कष्ट करून पोटाला चिमटे घेऊन मुलीला डॉक्टर केले त्या डॉक्टर मुलीला आत्महत्या करावी लागली या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने, संपदाच्या घरमालकाचा मुलगा बनकर, तिच्यावर दबाव आणणारे तथाकथित खासदार, त्यांचा पीए, आणि तक्रारीची दखल न घेणारे उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी या सर्वांची कसून चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे

प्रसार माध्यमांशी बोलताना आ.धस पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील जनता गोरगरीब असले तरी कष्टकरी परंतु स्वाभिमानी आहे राज्यात शैक्षणिक क्षेत्रात बीड जिल्ह्यातील मुला-मुलींनी नाव कमावले आहे मात्र तिला बीडची आहे असे म्हणून हिणवण्यात आले आहे ही अत्यंत चुकीची बाब आहे



डॉ.संपदा हिला आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले यामागे काहीतरी गंभीर कारण असावे

आमच्या भागातील गोरगरीब लेकींचा कोणी गैरफायदा घेत असेल त्यांना जरब बसण्याची आवश्यकता आहे.यापुढे दुसरी संपदा होऊ नये यासाठी या आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारा करण्यात यावा आणि हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा जेणेकरून आरोपींना तात्काळ शिक्षा मिळेल मयत डॉ.संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी मी भक्कमपणे उभा राहणार आहे असेही आ.धस यांनी शेवटी सांगितले..

# अस्मानी संकट! बोरद परिसरात अवकाळी पावसाचा कहर; तोंडाशी आलेला घास हिरावला, सोयाबीन, ज्वारी, मिरचीचे मोठे नुकसान

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी बोरद परिसरात पहाटे चार ते सहा दरम्यान जोरदार पावसाने हजेरी लावली आणि त्यानंतर सायंकाळी सहा वाजेनंतर पुन्हा पावसाची संततधार सुरू झाली. या अवकाळी संकटामुळे बोरदसह संपूर्ण परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकरी राजाचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसाचा सर्वात मोठा फटका शेतातील काढणीस आलेल्या पिकांना बसला आहे. काढणीच्या आणि मळणीच्या अवस्थेत असलेले सोयाबीन पूर्णपणे भिजले आहे. पावसामुळे सोयाबीनचा दाणा खराब होण्याची आणि मोठा आर्थिक तोटा होण्याची भीती निर्माण झाली आहे.त्याचबरोबर काढणीस आलेल्या ज्वारीचे पीकही पाण्याखाली गेले आहे, त्यामुळे ज्वारी सडून जाण्याची तसेच काळी पडण्याची शक्यता आहे.मिरचीच्या पिकाचेही मोठे नुकसान झाले असून, तोडा पूर्णपणे वाया गेला आहे. हातातोंडाशी आलेले पीक अचानक सुरू झालेल्या या अवकाळी पावसाने हिरावून घेतल्याने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. यावर्षी पावसाने वेळापत्रक न पाहता कधीही सुरुवात केली आहे, त्यामुळे शेतात पिकांचे होत्याचे नव्हते होत आहे. वर्षभराची मेहनत डोळ्यांदेखत वाया जात असल्याने आमचे दु:ख हे जगावेगळे आहे, अशी भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. सद्य:स्थितीत शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पाहता, शासनाने तातडीने या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत आणि बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी अशी जोरदार मागणी शेतकरी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे.


# नवापूर राष्ट्रीय महामार्गावर खड्डे ठरले 'यमदूत'; रायगण जवळ पिक अप पलटी, तातडीने दुरुस्तीची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर राष्ट्रीय महामार्गाच्या अत्यंत दयनीय अवस्थेमुळे पुन्हा एकदा मोठा अपघात झाला आहे. रायगण पेट्रोल पंपाजवळ असलेल्या रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यांमुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक पिक अप वाहन पलटी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातामुळे महामार्गाच्या धोकादायक स्थितीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,दिनांक २६/१०/२०२५ रोजी एम एच ४१ ए जी ०६८३ क्रमांकाची ही पिक अप गाडी नवापूरच्या दिशेने येत होती. मात्र, रायगण पेट्रोल पंपाजवळ महामार्गावर पडलेल्या एका मोठ्या खड्ड्यात गाडी आदळल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. नियंत्रण गमावल्यामुळे ही पिक अप गाडी रस्त्याच्या बाजूच्या खड्ड्यात जाऊन पलटी झाली. सुदैवाने या घटनेत मोठी जीवितहानी टळली असली तरी, महामार्गावरील खड्ड्यांचे 'यमदूत' स्वरूप पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

नवापूर राष्ट्रीय महामार्गावर जागोजागी मोठे आणि जीवघेणे खड्डे पडले आहेत. अनेक



ठिकाणी रस्त्याची चाळण झाली असून, त्यामुळे किरकोळ आणि गंभीर अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

महामार्गाच्या या धोकादायक स्थितीबद्दल स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. नागरिकांनी अनेकदा आणि वारंवार संबंधित प्रशासनाकडे तसेच लोकप्रतिनिधींकडे रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. मात्र, वारंवार मागणी करूनही महामार्गाची दुरुस्ती होत नसल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांनी संबंधित विभागाने या गंभीर घटनेची नोंद घेऊन, भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी तातडीने महामार्गाची दुरुस्ती आणि डागडुजी करण्याची मागणी पुन्हा एकदा जोरकसपणे केली आहे.

संपादकीय

# टायमिंगचा बादशहा

जेव्हा अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र यांसारखे अभिनेते सिनेमाचे क्षेत्र गाजवत होते आणि या काळात ते चित्रपटांना पूर्ण कवेत घेऊन होते. तेव्हा दूरदर्शन आणि छोट्या पडद्यावर अधिराज्य गाजवणारा अभिनेता होता सतीश शहा. त्यांच्या मालिका 'ये जो है जिंदगी', 'फिल्मी चक्कर' आणि 'साराभाई वि. साराभाई' या मालिकांतून सतीश शहा छोट्या पडद्यावर अधिराज्य गाजवत होते. फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमधून पदवीधर झालेले अभिनेते सतीश शहा यांना १९८३ चा चित्रपट 'जाने भी दो यारो' या चित्रपटासाठी कुंदन शहा याने कास्ट केले. तेव्हा त्याच्या मनात नसेल, की आपण एका अशा अभिनेत्याला पडद्यावर झळकवले आहे, की ज्याने चित्रपटाचे रंगरूप बदलून टाकणार आहोत. त्या नंतर सतीश शहा यांनी सिटकॉम 'ये जो है जिंदगी' ५५ भागांत वेगवेगळ्या भूमिका केल्या. त्यासाठीच ते ओळखले जात होते. दूरदर्शनवर ते सर्वत्र दिसत होते आणि त्यामुळे लोकांना मनोरंजनाचा हा नवा मसाला चांगलाच भावला. कारण तो लोकांच्या सर्व गरजा भागवत होता आणि लोकांना तो चित्रपटगृहात जाऊन पाहण्याची यातायात करण्याची गरज नव्हती. त्यामुळे हा नवा मनोरंजनाचा प्रकार लोकांना चांगलाच भावला आणि त्याला सतीश शहा यांच्यासारख्या अभिनेत्यांनी हसवण्याबरोबरच लोकांना अंतर्मुखही केले. सतीश रविलाल शहा यांचे अनेक चित्रपट आहे आणि अनेक मालिका आहेत. पण 'जाने भी दो यारो' आणि 'अरविंद देसाई की अजीब दास्तान' या मालिका काही विशेष उल्लेखनीय. पण शहा यांच्या 'जाने भी दो यारो' या चित्रपटातील भूमिकेसाठी ते ओळखले जातील. त्यांचे चित्रपट ही असंख्य आहेत. पण त्यांच्या चित्रपटाची मोजदाद करायची म्हटले तर ही त्यांच्या नावाची ही केवळ जंत्री होईल. शहा हे त्या प्रशिक्षित अभिनेत्यांपैकी एक होते जे नेहमी उच्च मागणीमध्ये असत आणि तेही टीव्ही आणि चित्रपटांत. त्यांच्या अभिनयातील खरी ताकद ओळखली ती कुंदन शहा यांनी. जे त्यांचे बॅच मेट होते. १९८४ साली आलेल्या दुसरा क्लासिक दूरदर्शन मालिकेत 'ये जो है जिंदगी' मध्ये त्यांनी त्यांना कास्ट केले आणि शहा यांनी या मालिकेचे सोने केले. ५५ वेगवेगळ्या वेशांत या मालिकेच्या प्रत्येक भागात ते दिसले आणि प्रत्येकवेळा लोकांना ते भावले. सतीश शहा यांच्या अभिनयाची शैली म्हणजे त्याचे विनोदाचं टायमिंग आणि कोणत्याही पात्रात सहजपणे विनोद आणण्याची हातोटी हे होते. त्यामुळे ते कोणत्याही भूमिकेत असोत, तो कधीही कंटाळा आणत नसत तर प्रसन्न शिडकावा विनोदाचा त्यांच्या प्रत्येक भूमिकेत असे.सतीश शहा यांना विनोदाचे टायमिंग अचूक साधले होते आणि त्यामुळे उत्तम विनोदाची जाण त्यांना होती. त्यांनी प्रत्येक भूमिकेतून विनोद निर्माण केला आणि तो सहज सुंदर असायचा. त्यांना कधीही ओढून ताणून विनोद करावा लागला नाही. त्यांच्या अभिनयाची खोली त्यातून दिसून येते. कोणत्याही भूमिकेला प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याची त्यांची शैली होती आणि त्यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात खास जागा निर्माण केली होती हे खरे. सतीश शहा यांनी आपल्या साथीदार कलाकारांना कधीही अपमानित केले नाही आणि त्यांच्या भूमिकांना खाल्ले नाही. सहसा चित्रपट जगात हे सर्वत्र चालते. पण सतीश शहा हे खऱ्या अर्थाने मानवतावादी होते. त्यांचे निधन किडनी निकामी झाल्याने झाले. सतीश शहा हे त्यांच्या कॉमिक टायमिंगसाठी ओळखले गेले आणि नंतरही कायम स्मृतीत राहिले अन् राहतील. चित्रपट आणि टीव्ही या दोन्ही माध्यमांत सारख्याच सहजतेने वावरणाऱ्या काही कलाकारांमध्ये सतीश शहा हे होते. सतीश शहा यांना त्यांचे आयुष्य हे त्यांना एक कोडे वाटायचे. याच दृष्टिकोनातून ते जगले आणि मूत्राशयाच्या विकाराने निधन पावले.स्वतःचे आयुष्य म्हणजे जिगसॉ पझलसारखे आहे असे ते समजत आणि म्हणूनच त्यांनी नियोजन कोणते केले नाही. एक तुकडा जागेवर पडला की बाकीचे तुकडे आपोआप जोडले जातात असे आपले आयुष्य आहे असे समजत. प्रदीर्घ काळ लोकांचे मनोरंजन केल्यानंतर ते बॉलिवुड आणि दूरदर्शनपासून दूर गेले होते. २०२३ मध्ये दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले होते. की मला काम करण्याची घाई नाही आणि मृत्यूची घाईही नाही. पण नियतीच्या मनात वेगळेच होते. २५० हून अधिक चित्रपटांतून काम आणि दूरदर्शन मालिकांमधून दररोज प्रेक्षकांना दर्शन देणारे सतीश शहा गेले कित्येक दिवस कुठेच दिसत नव्हते. सतीश शहा त्यांच्या अफलातून टायमिंगसाठी ओळखले जायचे पण त्यांच्या मृत्यूचे टायमिंग मात्र चुकले. कारण अजून ते बरीच वर्षे जगले असते. 'जाने भी दो यारो' ही एक ब्लॅक कॉमेडी होती. 'जाने भी दो यारो' या चित्रपटात केवळ एका मृतदेहाची भूमिका साकारून शहा यांनी अचानक कॉफीमधून बाहेर पडून कार चालवण्याच्या सीनमध्ये हसे वसूल केले होते. त्यावेळी त्यांच्या टायमिंगला दाद द्यावी की दिग्दर्शकाच्या कॉमिक सेन्सला याचा विचार करवत नसे. 'फिल्मी चक्कर' असो की 'साराभाई वि साराभाई' सतीश शहा यांनी जबरदस्त धमाका केला. बॉलिवुडमधील दुसरे एक हास्य अभिनेते असरानी यांच्या पाठोपाठ सतीश शहा यांच्या निधनाने बॉलिवुडवर शोककळा पसरली आहे. असे म्हणणे म्हणजे आत्मवंचना ठरेल, उत्तम विनोदाचे वावडे असलेल्या या जगात आणि जेथे विनोद म्हणजे पांचट आणि बाष्कळ शेरेबाजी यांची चलती आहे. अशा जगात सतीश शहा आणि असरानी या खऱ्याखुऱ्या विनोदवीरांनी जाणे ही काळाची मोठी शोकांतिका आहे. सतीश शहा यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# कोकण किनारा विकासाची नवी दिशा!

अनेकवेळा समुद्राचीही तोंडओळख नसलेल्या मंत्र्यांकडे कार्यभार असल्याने अनेकवेळा हा विभाग नेहमीच उपेक्षित राहिला. त्यामुळे वर्षानुवर्षे मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्वच प्रश्न आणि समस्या ज्याठिकाणी होते तिथेच राहिले. कोकणच्या मच्छीमारांचेही अनेक प्रश्न गेली अनेक वर्षे कागदावरच होते. या प्रश्नांची चर्चा विधीमंडळात झालीच तर ते प्रश्न सुटत नव्हते. परंतु दहा महिन्यांपूर्वी बंदरे व मत्स्य विभागाचा कार्यभार मत्स्योद्योग व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी स्विकारल्यानंतर कोकणातील १२१ कि.मी.च्या किनारपट्टीवर विकासाचा खऱ्या अर्थाने एक नव पर्व सुरू झालं.कोकणातील फळबागायती जशी निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे तसच कोकणातील मत्स्यव्यवसायही अलीकडच्याकाळात समुद्रात होणाऱ्या बदलावर अवलंबून झालेला आहे. कोकणातील फळबागायती असतील किंवा मत्स्यव्यवसाय याबाबतीत राज्यसरकारांनी यापूर्वी कधी फार विचारही केलेला दिसत नाही. एकतर काँग्रेसी सत्ताकाळात मत्स्यव्यवसाय खाते कुठल्यातरी विदर्भ किंवा मराठवाड्यातील नेत्याकडे मत्स्यविभागाच मंत्रालय दिलं जायच. ज्यांचा समुद्र आणि मत्स्यव्यवसायाशी काहीही संबंध नसायचा. कधी कोणती माहितीही नसायची अशा मंत्र्यांकडे हा या मत्स्यव्यवसाय विभागाचा कारभार असायचा. बर त्यातही त्यांना कोकणात आणि या मत्स्यव्यवसाय विभागात काडीचाही रस नसायचा. अनेकवेळा समुद्राचीही तोंडओळख नसलेल्या मंत्र्यांकडे कार्यभार असल्याने अनेकवेळा हा विभाग नेहमीच उपेक्षित राहिल्याचा पाहायला मिळाला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्वच प्रश्न आणि समस्या ज्याठिकाणी होते तिथेच राहिल्याचे पूर्वीचे कोकणच्या मच्छीमारांचेही अनेक प्रश्न गेली अनेक वर्षे कागदावरच होते. या प्रश्नांची चर्चा विधीमंडळात झालीच तर त्या प्रश्नांची सोडवणूक होत नव्हती; परंतु दहा महिन्यांपूर्वी बंदरे व मत्स्य विभागाचा कार्यभार नितेश राणे यांनी स्वीकारल्यानंतर कोकणातील १२१ कि.मी.च्या किनारपट्टीवर विकासाचा खऱ्याअर्थाने एक नव पर्व सुरू झालं.

कोकणच्या समुद्रात मासेमारीसाठी परराज्यातून मोठ्या प्रमाणावर आधुनिक ट्रॉलर्स येत होत्या. परराज्यातून येणाऱ्या बोटी कोकणातील समुद्रातील मत्स्योत्पादन घेऊन जायचे. बंदी असूनही ही मासेमारी व्हायची. परराज्यातील बोटींची दादागिरीही चालायची. त्यालाही आळा घालण्याची आवश्यकता होती. त्याबाबतीतही बंदरे आणि मत्स्यव्यवसाय विभागाने दखल घेत तो प्रयत्नही यशस्वी झाला. कोकणातील बोट वाहतूक बंद झाल्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत कोकणातील किनारपट्टीला अवखळा आली होती; परंतु आता पुन्हा एकदा कोकण किनारपट्टीला निश्चितच चांगले दिवस येतील यात शंका नाही. कोकणातील मच्छीमार हा परराज्यातून येणाऱ्या मासेमारी बोटींमुळे हैराण होता. छोटे पारंपरिक मच्छीमारी करणारे मच्छीमारही यामुळे साहजिकच त्रस्त होते. पूर्वी कारवाई काही होत नव्हती; परंतु परराज्यातील मच्छीमार बोटींवर कारवाई व्हायला लागल्यानंतर कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रात परराज्यातून येऊन अनधिकृतपणे मासेमारी करण्यावर आपोआपच बंधन आले आहे. एकीकडे मत्स्यव्यवसाय अडचणीत असताना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महायुती सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्याने कृषीला असलेल्या सोयी सुविधा मच्छीमारांनाही लागू होत आहेत. त्यातच सरकारने महाराष्ट्रातील मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणेच वीजदरात सवलत देण्यात आली आहे. मच्छीमारांना वीज दरात सवलत दिल्याने मच्छीमारांसाठी राज्यसरकारने घेतलेला हा फार मोठा निर्णय आहे. पाऊस, वादळ याचा तडाखा जसा फळबागायतदार शेतकरी यांना बसला आहे. या पार्श्वभूमीवर मच्छीमारांसाठी वीजदरात शेतकऱ्यांना जशी सवलत मिळते तशी सवलत मच्छीमारांना मिळणार असल्याने त्याचा फायदा महाराष्ट्रातील मच्छीमारांना मिळणार आहे.

शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांनाही सवलतीच्या दरात वीज देण्याची मागणी मत्स्योद्योग व विकासमंत्री नितेश राणे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. नितेश राणे यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकतेने मान्यता देत नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतही मच्छीमारांना सवलतीच्या दरात वीज देण्याचा निर्णय घेतला. या सवलतीच्या दरात वीज देण्याचा निर्णयाने राज्यातील मच्छीमार बांधवांना मोठा दिलासा मिळाला. मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना सवलतीच्या दरात वीज मिळण्यासाठी मत्स्यप्रकल्पाची राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळाकडे नोंदणी असणे आवश्यक असणार आहे. नितेश राणे यांनी राज्याच्या मत्स्यद्योग व बंदरे विकास खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर बंदरे विकास आणि मत्स्यविकासासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. जे निर्णय आजवर कधीच घेण्यात आले नव्हते. या घेतलेल्या निर्णयाने कोकणातील बंदरांना उर्जितावस्था प्राप्त होईल आणि उपेक्षित राहिलेल्या मच्छीमार बांधवांनाही समुद्रकिनारी विकासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभही झाला आहे. यामुळे कोकणातील मच्छीमार बांधव आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. मैत्रीपूर्ण स्वबळावरचे वारे...!महाराष्ट्रात सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांचे केव्हाही बिगुल वाजेल. निवडणुकीची आचारसंहिता जाहीर व्हायची सध्या प्रतीक्षा आहे. राज्यातील राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शिवसेना(उबाठा गट) यांची महाविकास आघाडी जरी मुंबईत निवडणुकीसाठी जागी झाली असली तरीही कोकणात मात्र महाविकास आघाडीतील सर्वच राजकीय पक्ष पूर्णपणे निद्रिस्त आहेत. कोकणात महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्ष आगामी निवडणुकांना सामोरे जाण्याच्याही मानसिकतेत नाही. महाविकास आघाडीतील घटक पक्षांतून काही मोजकेच कार्यकर्ते राहिले आहे. तर उबाठा सेनेतील अनेक कार्यकर्ते केव्हाही महायुतीतील घटक पक्षात उडी मारतील अशी स्थिती आहे. अनेक कार्यकर्ते फार सावध भूमिका घेऊन आहे. यामुळे महाविकास आघाडीच्या पक्षात पुढच्या १५ दिवस महिनाभरात काय घडेल हे सांगणे फारच अवघड आहे. निवडणुकांना सामोरे जाण्यासाठीचे कार्यकर्त्यांत बळ हवे असते. हे बळच कार्यकर्त्यांनी हरवल्यासारखे आहे. मात्र, कोकणातील राजकारणात महायुतीतील सर्वच पक्ष जोरात आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेले भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या महायुतीतील घटक पक्ष आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याच्या तयारीत आहे. नगरपंचायत, नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीमध्ये महायुतीतील सर्वच पक्षांना या निवडणुकीला स्वबळावर निवडणूक लढवून सामोरे जावे असे वाटते. प्रत्येक प्रभागात आणि जिल्हा परिषद, पंचायत समितीत एकापेक्षा अनेकजण इच्छुकही आहे. त्यामुळे कोकणात महायुतीतील घटक पक्षामध्ये मैत्रीपूर्ण लढती होतील अशी शक्यता आहे. अर्थात महायुतीतील नेत्यांमधील समन्वयातूनही या निवडणुकीसंबंधीचा निर्णय होऊ शकतात. रत्नागिरी जिल्ह्यातही राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना या तीनही पक्षांकडून महायुतीचा प्रयत्न होऊ शकेल किंवा स्वबळावर निवडणुका लढवल्या जाऊ शकतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मैत्रीपूर्ण लढती अपेक्षित आहेत. प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांनाही वाटत असते. आपल्याच पक्षाची ताकद अधिक आहे. आपण सहज निवडून येऊ शकतो किंवा निवडणुका जिंकू शकतो. यासाठी स्वबळावरच निवडणुका लडवल्या पाहिजेत असे वाटत रहाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी नेत्यांनाही निवडणुका स्वबळावर लढविण्याचा विचार करावा लागतो. यामुळेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि महायुतीचे कॅप्टन देवेंद्र फडणवीस यांनी मैत्रीपूर्ण लढतीचे सुतोवाच केले. मुंबईत महायुतीच्या माध्यमातून निवडणुका लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. कोकणातही महायुतीतील घटक पक्ष समन्वयानेच या निवडणुकांना सामोर जातील. ज्या जागांवर एकापेक्षा अधिकजण इच्छुक असतील तर त्याठिकाणी त्या-त्या भागातील राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन निर्णय घेण्यात येतील असा राजकीय धुरीणांचा अंदाज आहे. घोडा मैदान आता जवळच आहे. कोकणात राजकीयदृष्ट्या काय-काय घडेल याचे चित्र लवकरच स्पष्ट होईल

# प्रवासी नियमावली आली, पण सुरक्षिततेचे काय?

शयनयान बसमधल्या वाढत्या अपघातांमुळे सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या अपघातात प्रवासी गंभीर जखमी होतात किंवा त्यांचा मृत्यू होतो, काही दिवसांपूर्वीच कर्नूल येथे दुचाकीला धडकल्यानंतर बसला आग लागून २० जणांचा मृत्यू झाला. शयनयान बसच्या अपघातांसाठी अनेक कारणे असतात, ज्यात बसची किचकट रचना, प्रवासी गाढ झोपेत असणे आणि आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडण्यात येणाऱ्या अडचणीमुळे मानवी प्राणहानी मोठ्या प्रमाणात होते.सध्या या गोष्टी चर्चेला येण्याची कारणे म्हणजे गेल्या दिवसात या बसच्या अपघातात झालेली वाढ ही आहे. १० ते २४ ऑक्टोबर या केवळ १२ दिवसांत देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी १२ शयनयान बसला अपघात झालेत. कर्नूल अपघात घटनेत हैदराबादहून बंगळूरुला जाणारी स्लीपर बस एका दुचाकीला धडकली, त्यानंतर बसला भीषण आग लागली यात २० प्रवाशांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. कारण म्हणे तर अपघातानंतर बसमधील एका प्रवाशाच्या बॅटरीचा स्फोट झाला आणि बसमध्ये आग लागली. बसमधील प्रवासी गाढ झोपेत होते, ज्यामुळे ते आगीतून बाहेर पडू शकले नाही. आग्रा-लखनऊ एक्स्प्रेसवे अपघात (जुलै २०२४) एका स्लीपर बसने टँकरला धडक दिली. यात १८ जणांचा मृत्यू झाला. कारण काय तर जोरदार धडकेमुळे बसचे मोठे नुकसान झाले. स्लीपर बस अपघातांची कारणे शोधता, असे लक्षात येते की, अपघातावेळी प्रवाशांना बाहेर पडणे कठीण होते, कारण बसच्या डिझाइनमुळे आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग बंद होतात. काही बसेसमध्ये एकावेळी ३० ते ४० प्रवासी बसू शकतात, ज्यामुळे बाहेर पडण्यात अडचणी निर्माण होतात.शयनयान बसमध्ये प्रवासी झोपलेले असल्याने, अपघात झाल्यावर लगेच प्रतिसाद देणे शक्य होत नाही. अपघातानंतर आगीमुळे किंवा इतर कारणांमुळे लोकांना लगेच मदत मिळणे कठीण होते आणि प्राणहानी वाढते. सध्या वाहतूक मंत्रालय स्लीपर बसच्या डिझाइनमधील त्रुटी दूर करण्यासाठी विचार करत आहे. मात्र ही चर्चा केवळ एखादा मोठा अपघात झाला की होते आणि पुन्हा सर्व आहे तशीच होते. अपघाताच्या वेळी सुरक्षित बाहेर पडता यावे यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. बसची नियमित देखभाल करणे आणि टायरची तपासणी करणे हे अपघाताची शक्यता कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे. शयनयान (स्लीपर) बसच्या अपघातांची वाढ ही चिंतेची बाब आहे.अपघातांचे मुख्य कारण म्हणजे मर्यादित जागेमुळे प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडणे कठीण होते, ज्यामुळे मृत्यू आणि दुखापतीची संख्या वाढते. याशिवाय, काही बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि सीट बेल्ट सारख्या सुरक्षा उपकरणांचा अभाव आहे, ज्यामुळे अपघातांची जोखीम अधिक वाढत आहे. या बसेसच्या डिझाइनमध्ये त्रुटी असतात. काही डिझाइनमध्ये प्रवाशांना अपघाताच्या वेळी बाहेर



पडण्यासाठी योग्य मार्ग नसतात, ज्यामुळे ते अडकून राहू शकतात.आज स्लीपर बाबतीत म्हणायला गेलं तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची काय स्थिती आहे. आज एसटीकडे एकूण २५० स्लीपर बस आहेत त्यात स्लीपर सीटर २०० असून संपूर्ण शयनयन बस या ५० आहेत. या संपूर्णपणे श्रेणी प्रकारातील आहेत मात्र या सर्व बस साध्या बस गाड्या आहेत त्या वातानुकूलित नाहीत. मात्र आज या बस गाड्यांची अवस्था पाहता या बसमध्ये बसावे की झोपावे हे काहीच कळत नाही इतकी बिकट अवस्था आज महामंडळाने या स्लीपर बस गाड्यांची करून ठेवली आहे यात सर्व आपत्कालीन दरवाजे हे पत्र ठोकून बंद करण्यात आले आहेत त्यामुळे एखाद्या कठीण प्रसंगी प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यात बसच्या पडद्यांची अवस्था वाईट असून तर काही बसला पडदेच नाहीत. प्रवाशांना आपत्कालीन दरवाजे तसेच त्या बाबत सूचना करण्याची कोणतीच यंत्रणा नाही या बस गाड्या रात्री प्रवास करून झाल्यानंतर साफसफाई केल्या जात नाहीत त्यामुळे आतमध्ये बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली दिसते. एसटी महामंडळाच्या या बस गाड्या सध्या सर्रास दिवसा धावताना दिसतात, तर काही छोट्या व लोकल मार्गांवरही स्लीपर बस गाड्या पाठवल्या जातात रात्री प्रवास करून झाला की दिवसा या बस गाड्या लोकल बस मार्गावर चालवल्या जातात व पुन्हा रात्री चालवल्या जातात त्यामुळे बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट होऊन बसली आहे. संपूर्ण पैसे मोजूनही व वारंवार तक्रारी करूनही एसटी महामंडळ त्याकडे लक्ष देत नाही विशेष म्हणजे या शयन यान बस गाड्यांचा एक वेगळा ब्रँड तयार करावयास व्हावा होता मात्र एसटीला ते जमले नाही. विशेष बोलायचं झालं तर स्लीपर बस गाड्यांचे आकर्षण हे फक्त भारतातच आहे इतर कोणत्याही देशांमध्ये स्लीपर गाड्यांचा वापर हा प्रवाशांसाठी केला जात नाही. भलेही इतर देशांची भौगोलिक रचना वेगळी व भारतातील भौगोलिक परिस्थिती वेगळी असली तरी, परदेशात कोणत्याही देशात स्लीपर गाड्या या वापरल्या जात नाहीत फक्त भारतातच याचे मोठे फॅड बनले आहे. बरं याच्यात सुरक्षिततेचे कोणतीच नियम पाळली जात नाही, तर आपल्या इथे भ्रष्टाचाराचे कसे टोक गाठले जाते ते येथे पाहता येईल कोणत्याही बस गाड्यांमध्ये सुरक्षिततेचे कोणतेही नियम पाळले जात नाही या बस गाड्या बनवतानाही त्या देशातल्या कोणत्याही भागात बनवल्या जातात मात्र त्यावेळेस त्यांना तेथील आरटीओ मान्यता देत नाहीत मग या बस गाड्या रजिस्ट्रेशनसाठी चक्क पॉण्डेचरी, नागालँड, अरुणाचल प्रदेश यासारख्या ठिकाणी रजिस्टर होऊन येतात. मग देश एक व सगळीकडे वेगवेगळे आरटीओ नियम का? स्लीपर बस गाड्या चालवण्यामागे एक मोठा ब्रॅकेट आहे. त्यात या बस गाड्या चालवण्यापासून रस्त्यावर वाहतूक करण्यासाठी सर्व बांधलेले असतात. त्यामुळे सर्रास वाहतूक सुरू असते. मात्र एखादा अपघात घडला की थोडेफार दिवस कारवाई होते. मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. मग दुसरा एखादा अपघात होईपर्यंत सर्व शांत. तसे बघायला गेले तर स्लीपर बसचा प्रवास बसून करण्यापेक्षा धोकादायकच आहे. या प्रवासात अपघात झाल्यानंतर बाहेर पाडण्याचे मार्गच बंद होतात. त्यात आग लागली तर बसमधील पडदे पेट घेतात. बसमधील पार्टीशनसाठी सर्रास लाकूड वापरले जाते ते पेट घेते आणि काही कळायच्या आत मनुष्यहानी व वित्तहानी होते. १ जुलै २०२३ रोजी नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावर स्लीपर बसला लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता, या अपघातानंतर सर्व स्लीपर बसची झाडाझडती सुरु झाली होती, मात्र काही दिवसाच्या आत सर्व बस या रस्त्यांवर धावू लागल्या. यातच सर्व काही आले. त्यातच आता परिवहन विभागांनी स्लीपर बस ने प्रवास करताना प्रवाशांसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. त्यात प्रवास करताना प्रवाशांनी कशी काळजी घ्यावी याचा उल्लेख आहे. मात्र येथे सुद्धा प्रवाशांना वेठीस धरण्याचा परिवहन विभागाचा प्रयत्न दिसतो. मुळात बस गाड्यांची अवस्था वाईट असणे त्यात कोणतीही सुख-सुविधा नसणे उदाहरणार्थ प्रत्येक खिडकीजवळ हातोडा असणे हे गृहीत धरले आहे. मात्र सर्व बसगाड्यातील हातोडे हे गायब झाले आहेत. आपत्कालीन दरवाजांचा तर पत्ताच नाही. अशी अवस्था आहे, मग नियम हे कोणासाठी? जर तेच परिवहन विभागाने बस गाड्यांवर लक्ष ठेवले व थोडा यातील भ्रष्टाचार कमी केला तर यथावकाशच अपघात टाळतील हे नक्की.

# तळोद्यात लोहपुरुष सरदार पटेलांच्या १५०व्या जयंती निमित्त 'रक्तदान शिबिरातून' राष्ट्रीय ऐक्याचा संदेश!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून तळोदा शहरात भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. समस्त गुर्जर समाज तळोदा तालुका आणि(व्ही.एस.जी.जी.एम.)यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्यातून समाजात एकता आणि राष्ट्रिय ऐक्याचा नवा संदेश देण्यात आला.

रविवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता जय कुबेर ॲग्रो, शहादा रोड, तळोदा (जि. नंदुरबार) येथे या शिबिराला सुरुवात झाली. या स्तुत्य उपक्रमासाठी युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समस्त दोडे गुजर समाजाचे अध्यक्ष बापू पाटील यांनी पदभार स्वीकारला. कार्यक्रमाचे उद्घाटन बापू पाटील यांच्यासह प्रवीण पटेल आणि(व्ही.एस.जी.जी.एम.) चे डॉ. जयेशभाई पटेल (सुरत) यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात प्रमुख पाहूणे म्हणून माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, किरण सूर्यवंशी आणि रुपसिंग पाडवी यांची उपस्थिती लाभली. यावेळी भरत पाटील, संजय पटेल, महेंद्र पटेल, कांतीलाल पाटील, सुभाष पटेल, गणेश पटेल, हरकलाल पाटील, संजय चौधरी, भरत पटेल , संजय पटेल, डॉ. भूपेंद्रभाई पटेल, विनोद पाटील, दिलीप पटेल, गोविंद पाटील, संदीप पटेल, तेजस सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिराला तळोद्यातील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




नवजीवन ब्लड सेंटर, धुळे यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले. शिबिरात मोठ्या प्रमाणात रक्त संकलन झाले. लोहपुरुषांच्या महान कार्यातून प्रेरणा घेऊन रक्तदात्यांनी राष्ट्रभक्तीची भावना व्यक्त केली. रक्तदान करणाऱ्या सर्व शिबिरार्थींचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला, तसेच त्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. गुर्जर समाजाचे पदाधिकारी, शहरातील विविध सामाजिक संस्थांचे सदस्य व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोहपुरुषांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन हा रक्तदान उपक्रम समाजात एकतेचा आणि राष्ट्रीय ऐक्याचा नवा संदेश देणारा ठरला, असे मत आयोजकांनी व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूषण पाटील, चंद्रकांत पाटील, मनिष पटेल, सागर पाटील, योगेश पटेल, प्रदीप पाटील, मयूर पटेल, आशुतोष पटेल, निखिल पटेल, राहुल पटेल, शुभम पटेल, गणेशभाई पाटील, डॉ. भूषणभाई पटेल, रोशन पटेल, रोहित पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हितेंद्र पाटील यांनी केले.

## तहसील कार्यालय येथे शेतकऱ्यांसह खा.संजय देशमुख यांनी चटणी भाकर खाऊन केली काळी दिवाळी साजरी

दैनिक वादळ वार्ता
**दिग्रस । प्रतिनिधी**



दिग्रस: तहसील कार्यालय दिग्रस येथे खासदार संजय देशमुख यांच्या नेतृत्वात हजारो शेतकऱ्यासह सरकारच्या निषेधार्थ चटणी भाकर खाऊन केली काळी दिवाळी साजरी. या वेळी आपल्या भाषणातून खासदार देशमुख यांनी सरकार वर निशाणा साधला. शेतकरी हवालदिल झाला आहे आर्थिक संकटात सापडला आहे.सरकारनी अनेक घोषणा केल्या आणि शेतकऱ्यांना मदतीच खूप मोठं पॅकेज दाखवण्याचा प्रयत्न केला. मात्र शेतकऱ्यांना हेक्टरी बारा हजार मिळणार असून तेही बऱ्याच शेतकऱ्याला दिवाळी पूर्वी अद्याप पर्यंत मिळालेले नाही. आपल्या सर्वांचे दुर्दैव आहे. या मतदार संघाचे नेतृत्व पालकमंत्री करत आहे. अतिवृष्टीमुळे सर्वात जास्त नुकसान यवतमाळ जिल्ह्याच झाल्याची आकडेवारी असताना दिग्रस तालुका वगळला होता. त्या वेळी पालकमंत्री कुठे गेले होते. असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.शेतकऱ्यांच्या पाठीमागे माननीय माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या काळामध्ये खऱ्या अर्थाने आमच्या शेतकऱ्यांची कर्ज माफी केली होती. तुम्ही आम्ही सर्वांनी पाहिलेला आहे. कोणतेही कागदपत्रे नाही ऑनलाईन नाही अशा प्रकारचे काम केलं परंतु दुर्दैव आहे. सातबारा कोरा करण्याचा आश्वासन देऊन देखील एक वर्ष होऊन सुद्धा शेतकऱ्यांची कर्जमाफी या ठिकाणी केली जात नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात सर्व कार्यकर्ते आणि सर्व शेतकरी बांधव मिळून रस्त्यावर उतरून ओला दुष्काळ, हेक्टरी पन्नास हजार व शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी,आपण केल्याशिवाय राहणार नाही.असा इशाराही खासदार देशमुख यांनी या चटणी भाकर शिदोरी आंदोलनातून दिला.यावेळी तालुका प्रमुख रवींद्र आरगडे शहर प्रमुख राहुल देशपांडे , काशीनाथ मोगले, किशोर आडे, राजेश सवने, डॉ.घाटगे, भिमराव खारोडे,सह कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रत्येक माता-पित्याने आपल्या मुलांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श रुजवावा-यशपाल बोरे

दैनिक वादळ वार्ता
**निलंगा । प्रतिनिधी**



समाजातील समानता, न्याय आणि स्वाभिमान या मूल्यांची खरी जोपासना घराघरातून सुरू होते. त्यामुळे प्रत्येक माता-पित्याने आपल्या मुलांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार रुजवावे. मुलांमध्ये समता, मानवता, समाजसेवा व निर्णयक्षमतेची वृत्ती निर्माण झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचा आदर्श मुलांच्या जीवनात प्रत्यक्ष दिसला पाहिजे, असे मत भीम आर्मी भारत एकता मिशनचे राष्ट्रीय सचिव यशपाल बोरे यांनी व्यक्त केले. ते मौजे चांदोरी तालुका निलंगा जिल्हा लातूर येथे भीम आर्मी भारत एकता मिशन शाखा उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी मराठवाडा निरीक्षक तथा महाराष्ट्र प्रदेश संघटक अक्षय धावारे माजी मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे,जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे,जिल्हा उपाध्यक्ष विशाल पोटभरे,जिल्हा सचिव बबलू शिंदे, निलंगा तालुकाध्यक्ष अतुल सोनकांबळे, तालुका उपाध्यक्ष.

राज लोखंडे, अनिल कांबळे,तालुका महासचिव किशोर सुरवसे , सचिव बालाजी सुरवसे,तालुका सचिव दिगंबर सूर्यवंशी,तालुका उपाध्यक्ष अनिल सुरवसे ,

प्रथमेश सूर्यवंशी,अर्जुन जाधव,मनोज कांबळे,बालाजी सोनटक्के आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना यशवंत बोरे पुढे म्हणाले की,मुलांना फक्त शिक्षण देणे पुरेसे नाही; मुलांना समाजकार्य, नैतिकता आणि स्वावलंबी जीवनाचे मूल्य शिकवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जर प्रत्येक कुटुंब आपल्या मुलांमध्ये डॉ. बाबासाहेबांचा आदर्श रुजवेल, तर भविष्यात आपण एक प्रगत, न्यायपूर्ण आणि समानतावादी समाज उभा करू शकू. तरुण आणि प्रौढ नागरिकांनी एकमताने डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे जीवनात पालन करणे गरजेचे आहे. घरा-घरातूनच मुलांमध्ये सकारात्मक मूल्यांची पेरणी केली तर समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी पायाभरणी होईल असेही ते यावेळी म्हणाले...

## बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात माजीविद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

# आदर्श विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न;शिक्षकांचा शाल,श्रीफळ व फेटा बांधून केला सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात शनिवारी माजी विद्यार्थ्यांचा भव्य आणि भावनिक मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला.२००६ च्या दहावी च्या व २००८ च्या बारावी च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे हा मेळावा आयोजित केला होता. जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्व माजी विद्यार्थी,शिक्षक आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोकराव काकडे, सचिव बालासाहेब काकडे,मुख्याध्यापिका सौ.सिंधुताई चव्हाण,वृक्ष मीत्र सुधाकर देशमुख, दिलीप पारेकर,बन्सीधर देशमुख,राजेंद्र मस्के, गणपत पांचाळ,शिवाजी मांदळे,संतोष रोकडे, काळे मॅडम आणि विष्णू कावळे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुंदर आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शाळेच्या आठवणींवर आधारित सादरीकरणे,कविता,गाणी व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून सर्वांचे मन जिंकले.शिक्षकांना फेटे बांधून,पुष्पहार अर्पण करून,शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.वातावरणात एक प्रकारचा भावनिक आणि आनंददायी उत्साह पसरला होता.या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनीशिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत शाळेतील अनुभवांची आठवण ताजी केली. जुन्या मित्रमैत्रिणींची भेट, शालेय जीवनातील गंमती जमती आणि आठवणींनी सर्वांनाच भूतकाळात नेलेमेळाव्याच्या निमित्ताने जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सर्वांनी एकत्र जेवणाचा आस्वाद घेत जुने दिवस आठवले.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत पुढील काळात अशा मेळाव्यांचे सातत्य राखावे असे आवाहन केले.मेळाव्यात सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यां मध्ये नवनाथ काकडे, भूषण करपे,राहुल शिंदे, प्रतिभा क्षिरसागर,कल्पना शिंदे,प्रमोद जोगदंड,उषा टोणगे,सविता जाधव, सूरज लोखंडे,छायावैरागे, ज्ञानेश्वर गोरे,निलेश गोरेमाळी,राजकुमार वाघचौरे,माचिंद्र आंबाड, धोंडिराम बंडे,बालाजी गोरे,शिल्पा मस्के, व्यंकटेश नाईकवाडे,प्रज्ञा जाधव,देवराव कोकणे, बालकृष्ण यादव,कुलदीप करपे,बालिका पवार, पल्लवी डांगे,सुलोचना गोरे,पूनम मुळे,सरलाशिंदे आणि भारती काकडे आदींचा समावेश होता.मेळाव्याचे सूत्रसंचालन कल्पना शिंदे आणि प्रतिभा क्षिरसागर अत्यंत देखण्या व विनोदी शैलीत पार पडले, तर शेवटी सर्व उपस्थितांनी आदर्श विद्यालयात पुन्हा भेटू या असा संकल्प व्यक्त केला.




## ना.अजित पवार यांचा उपस्थित मध्ये देगलूर शहरातील अनेक दिग्ज राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**




नांदेड जिल्ह्यातील देगलूर शहरात राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ना. अजित पवार यांच्या उपस्थितीत अनेक दिग्गज नेत्यांनी पक्षात प्रवेश केला. या प्रसंगी गोरठेकर कुटुंबीयांसह अनेक माजी नगरसेवक आणि ज्येष्ठ कार्यकर्ते राष्ट्रवादीत सहभागी झाले, ज्यामुळे पक्षाला नांदेड परिसरात मोठा बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

यावेळी उमरी आणि देगलूर येथील राजकीय वातावरणात विशेष चैतन्य दिसून आले. माजी आमदार दिवंगत बापूसाहेब गोरठेकरांचे सुपुत्र शिरीष गोरठेकर आणि कैलाश गोरठेकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत गोरठेकर गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये समाविष्ट झाले. या गटाचे नायगाव विधानसभा मतदार संघातील राजकीय वजन लक्षात घेता पक्षाचे स्थानिक प्रभाव वाढेल, अशी अपेक्षा आहे. तसेच, देगलूर येथील काही यशस्वी माजी नगरसेवकांच्या प्रवेशामुळेही पक्षाच्या तळागाळाला बळकटी प्राप्त होणार आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या प्रवेशामुळे नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादीमध्ये एकात्मता वाढण्याचा प्रयत्न आहे, जे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी पक्षाचे स्थान अधिक मजबूत करेल. अजित पवार यांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन नव्याने आलेल्या नेत्यांचे स्वागत केले आणि ते म्हणाले, हा केवळ पक्षाला बळ देण्याचा उपक्रम नाही, तर महाराष्ट्रातील शाश्वत विकास आणि राजकीय स्थिरता यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. लोकांनी या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद दिला, अगदी पावसाच्या तडाख्यातही अजित पवार यांनी भाषण पूर्ण करून उपस्थितांचे मन जिंकले. या प्रवेश कार्यक्रमाचा आणखी एक पैलू म्हणजे पक्षाच्या आतल्या गटांमधील तणाव आणि स्थानिक राजकारणातील पुनर्रचना. गोरठेकर गटाला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील केल्याने पक्षाच्या अंतर्गत गतिरोध कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि इतर वरिष्ठ नेतेही या कार्यक्रमात उपस्थित होते आणि त्यांनी एकात्मतेची भूमिका बजावली.

या प्रवेशातून नांदेडसह उमरी, देगलूर या भागात राष्ट्रवादीचा सत्तासंख्य वाढण्याची शक्यता असल्याने येत्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद वाढेल, असे राजकीय दृष्टीने पाहण्यात येत आहे. शिवाय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्यामुळे ही एक महत्त्वाची राजकीय हालचाल मानली जात आहे.

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी; चौसाळा बसस्थानक येथे निदर्शने

लोकनेता न्यूज नेटवर्क
**बीड । प्रतिनिधी**




सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या बीड जिल्ह्याच्या भुमिकन्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनात शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ शनिवार रोजी चौसाळा बसस्थानक येथे सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली. डॉ. संपदा मुंडे (रा. कोठारबन, ह.मु. कवडगाव, ता. वडवणी, जि. बीड) यांनी फलटण येथे कार्यरत असताना पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने आणि घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर यांच्या शारीरिक व मानसिक छळामुळे आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या तळहातावर आत्महत्येचे कारण लिहिले होते, तसेच घरच्यांना शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जातो असे सांगितले होते. त्यांनी यासंदर्भात उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली होती, मात्र वेळेत कारवाई न झाल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुंडे कुटुंबियांनीही बीड जिल्ह्याची मुलगी असल्यामुळे तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले असा गंभीर आरोप केला आहे.

आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी अशी आहे की -

या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी.

आत्महत्येस जबाबदार असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांवर व अन्य दोषींवर कठोर कारवाई करावी.

तसेच शवविच्छेदन अहवालात हस्तक्षेप करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत.

रिपाई जिल्हा उपाध्यक्ष बापुराव पवार,माजी सभापती काकासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनावणे पांडुरंग, शिवसंग्राम नेते पांडुरंग आवारे, कल्याण महाराज जगताप, प्रदेशाध्यक्ष छत्रपती राजेशाहु महाराज विचारमंच विवेक कुचेकर,प्रा.आबासाहेब जाधव,बळीराम राऊत,मुस्तफा पठाण,आजिनाथ सोनावणे, सोहेल पठाण, प्रमोद नाईकवाडे, संतोष बोरखेडे, आत्माराम नाईकवाडे, उत्तम जाधव, लिंबाजी तांदळे , पत्रकार एन टी.वाघमारे, विकास नाईकवाडे , चौसाळा पोलिस ठाण्याचे सचिन मुरूमकर,सचिन गर्जे उपस्थित होते.

आदी आंदोलनात सहभागी होऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# पंकजाताई मुंडेंच्या हस्ते बदामराव पंडितांचा भाजपात जाहीर प्रवेश; गेवराईत पुन्हा दिवाळी

## मुस्लिम बांधवांनी वाजवले फटाके

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जय महाराष्ट्र घालून राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे गेवराई तालुक्यात कार्यकर्त्यांकडून पुन्हा फटाके वाजून दिवाळी साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे मुस्लिम समाज बांधवांनी गेवराई शहरात फटाक्यांची प्रचंड आतिषबाजी करून या प्रवेशाला पाठिंबा दिला आहे.

दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी परळी येथे भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्राच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आयोजित केलेल्या दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमात गेवराई विधानसभा मतदारसंघातील लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. नामदार पंकजाताई मुंडे यांनी त्यांचे गळ्यात भाजपचा रुमाल आणि पुष्पहार घालून स्वागत केले. याप्रसंगी माजी खा. प्रीतमताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडचिठ्ठी देऊन भाजपात प्रवेश केल्याने हा बीड जिल्ह्यात शिवसेनेला मोठा धक्का समजला जात आहे. गोरगरिबांनी सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने झगडणारे नेते म्हणून बदामराव पंडित यांची राज्यभरात ओळख आहे. तीन वेळेस आमदार आणि शिवसेना-भाजप युती सरकारमध्ये ग्रामविकास राज्यमंत्री म्हणून काम केलेले माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे अत्यंत निकटवर्तीय राहिलेले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी कडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढविलेले बदामराव पंडित हे ७३ हजार मते घेऊन दुसऱ्या स्थानावर राहिले होते. राज्याचे



मुख्यमंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस ना पंकजाताई मुंडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट आणि चर्चा नंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी परळी येथे ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते माजी खा प्रीतमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. यावेळी युवा नेते बाळराजे पवार, यांच्यासह युवा नेते रोहित पंडित, बजरंग सानप, सुनील ढाकणे, नारायण गाडे, बाळासाहेब नागटिळक, बाळासाहेब राऊत, राजेश करांडे, उज्वल सुतार आदींसह भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांच्या प्रवेशामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीला मोठी ताकद मिळणार आहे. नुकत्याच होऊ घातलेल्या नगर परिषद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये बदामराव पंडित यांच्या भाजपा प्रवेशाने गेवराई तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची मोठी अडचण होणार असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. कारण बदामराव पंडित आणि बाळराजे पवार हे दोघेही भाजपमध्ये एकत्रित आल्याने खांद्याला खांदा लावून त्यांनी काम करावे आणि गेवराई विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्यांची कामे करून भारतीय जनता पार्टीची ताकद वाढवावी असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी दोघांनाही केले आहे. बदामराव पंडित यांचा भाजपात प्रवेश झाल्याचे समजताच गेवराई तालुक्यात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त केला. विशेष म्हणजे गेवराई शहरात मुस्लिम समाज बांधवांनी फटाक्यांची आतिषबाजी करत बदामराव च्या प्रवेशाला पाठिंबा दिल्याचे दिसले.

# केज तालुक्यातील कोरेगाव येथे घराचे कुलूप तोडून साडेपाच लाखाचे दागिने चोरले

## केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कोरेगाव शिवारातील वैतागवस्ती येथील शेतकरी बळीराम तांदळे हे कुटुंबातील सर्वांना घेवून भाऊबीजेच्या दिवशी घराशेजारी असलेल्या शेतात गेले असता गुरूवारी दि.२३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सव्वा चार ते साडे पाच वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यानी त्यांच्या राहत्या घराच्या चॅनल गेटचे कुलूप तोडून पेटीत व धान्याच्या कोठीत ठेवलेले ५ लाख ८१ हजार ५०० रुपयाचे घरात ठेवलेले २७ तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कोरेगाव शिवारातील वैतागवाडी वस्तीवर येथे गुरुवारी






दि.२३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सव्वा चार ते साडे पाच वाजण्याच्या दरम्यान बळीराम भगवान तांदळे हे आपल्या पत्नीसह घरा शेजारीच असलेल्या शेतात गेले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांच्याघराच्या लोखंडी चॅनल गेटचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला.व घरात ठेवलेल्या पेटी आणि धान्याच्या कोठीत ठेवलेले ८ तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या,सोन्याचा हार, नेकलेस,मिनी गंठण, झुंबर,वेल,चैन,अंगठ्या, सोन्याची पोत,नथ, सोन्याची साखळी,सेव्हन पीस,सोन्याचे फुलं, सोन्याच्या काड्या असे एकूण २७ तोळे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे जुने वापरातील दागिने ज्याची किंमत ५ लाख ८१ हजार ५०० रुपये आहे. या दागिन्यांची चोरी करून अज्ञात चोरट्यानी पोबारा केला.बळीराम तांदळे यांच्या फिर्यादी वरून केज पोलिसात शुक्रवारी मध्यरात्री पावणे एक वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.

# केजच्या जयभवानी चौकात वाहतूक कोंडी

## पोलिसांचा मागमूस नाही नागरिकांनीच केली वाहतूक सुरळीत

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील जय भवानी चौकातप्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली.ऐन दिवाळीच्या सणामुळे शहरात वाढलेल्या वाहतुकीचा ताण नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत पाहू लागला.मात्र या ठिकाणी वाहतूक नियोजनासाठी पोलिसांचा कुठेही मागमूस नव्हता,हे विशेष लक्षवेधी ठरले.वाहतूक कोंडी वाढत गेल्याने स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेऊन स्वतःच वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान पत्रकारांनी केज पोलिस ठाण्याचे निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना परिस्थितीचीमाहिती देण्यासाठी संपर्क साधला असता,त्यांनी आमच्या कडे ८५ पोलिस आहेत, तुम्ही ट्रॅफिक विभागाच्या



नंबरवर कॉल करत जा, अशी उदासीन प्रतिक्रिया दिली.या उत्तरामुळे पत्रकार आणि नागरिकां मध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटला असून, पोलिसांना मदतीसाठी फोन करावा की नाही,हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.


घटनेनंतर काही वेळाने ट्रॅफिक पोलिस घटनास्थळी दाखल झाले, मात्र तोपर्यंतनागरिकांनीच कोंडी कमी करून रस्ता मोकळा केला होता.जय भवानी चौक हा केज शहराचा मध्यबिंदू असून येथून तीन प्रमुख मार्ग बीड,परळी आणि धारूर दिशेने जातात.त्यामुळे या ठिकाणी दिवसभर मोठी रहदारी असते. सणासुदीच्या काळात वाहतूक व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष द्यायला हवे होते,अशी नागरिकांची मागणी आहे.स्थानिक व्यापारी,नागरिक आणि वाहनधारकांनी वाहतूक विभागाच्या निष्काळजी पणावर तीव्र नाराजी व्यक्त केली असून,पोलिस प्रशासनाने तात्काळ आवश्यक उपाययोजना कराव्यात,अशी मागणी त्यांनी केली आहे.

# चांदसैली घाटात महाकाय दरड कोसळली!

## धडगावचा नंदुरबारशी संपर्क तुटला; नागरिकांना ४५ किमीचा अतिरिक्त फेरा

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

सातपुड्यात सतत सुरू असलेल्या पावसामुळे धडगाव तालुक्याला नंदुरबार मुख्यालयाशी जोडणाऱ्या महत्त्वाच्या चांदसैली घाटात रविवारी पहाटेच्या सुमारास मोठी दरड कोसळण्याची गंभीर घटना घडली आहे. या महाकाय दरडीमुळे धडगाव तळोदा हा मुख्य घाट मार्ग पूर्णतः बंद झाला असून, प्रशासनाने हा मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू होण्यास तीन ते चार दिवस लागतील असा अंदाज व्यक्त केला आहे. या घटनेमुळे धडगाव या अतिदुर्गम तालुक्याचा नंदुरबार मुख्यालयाशी असलेला थेट संपर्क तुटला आहे. पर्यायी



व्यवस्था म्हणून नागरिकांना आता शहादा मार्गे नंदुरबार गाठावे लागत आहे. हा पर्यायी मार्ग सुमारे १०५ किलोमीटर लांब असल्याने वाहनधारकांना तब्बल ४५ किलोमीटरचा अतिरिक्त फेरा मारावा लागत आहे. परिणामी, प्रवासाचा वेळ आणि आर्थिक भुर्दंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

ऐन दिवाळी सणाचा हंगाम सुरू असतानाच रस्ता बंद झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. दरड हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असले तरी, घाट मार्ग मोकळा करण्याची निश्चित मुदत जाहीर न झाल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या मार्गावर दरडी कोसळणे ही वारंवार होणारी समस्या बनली आहे. प्रत्येक वेळी सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ता मोकळा करून तात्पुरती दुरुस्ती करत असल्याचा आरोप वाहनधारक करत आहेत. सततच्या दरड कोसळण्याच्या धोक्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

प्रशासनाने नागरिकांना पुढील तीन ते चार दिवस चांदसैली घाट मार्गे प्रवास पूर्णपणे टाळण्याचे आणि पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# औसा येथील आमदार अभिमन्यू पवार,अ‍ॅड.परीक्षित पवार व शिवरुद्र मिरगे यांना दीपावलीच्या शुभेच्छा

दैनिक वादळ वार्ता
**औसा । खालेद काझी**

दीपावली सणानिमित्त औसा येथील पत्रकारांच्या वतीने मा. आमदार अभिमन्यू पवार, ॲड. परीक्षित पवार व शिवरुद्र मिरगे यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी औसा तालुक्यातील विविध माध्यमातील पत्रकार उपस्थित होते. पत्रकार बांधवांनी या तिन्ही मान्यवरांना फुलांचा गुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या व औसा तालुक्याच्या विकासासाठी त्यांच्या पुढाकाराचे कौतुक केले. यावेळी मान्यवरांनीही पत्रकार बांधवांचे आभार मानले व दीपावलीनंतर नवीन उत्साहाने सामाजिक कार्य आणि विकास उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. औसा तालुक्यातील जनतेला देखील



दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देत सर्वांनी आनंद, ऐक्य आणि शांततेत सण साजरा करावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

# वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडनुक ताकतीने लढणार-इंजी.प्रशांत उघडे

दैनिक वादळ वार्ता
**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी धारूर तालुक्यात ताकतीने निवडणुका लढविणार असल्याचे माहिती वंचित बहुजन आघाडीचे धारूर तालुकाध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी प्रसिद्धीपत्रकात माहिती दिली आहे.

धारूर तालुक्यात जिल्हा परिषदेचे ३ गट व पंचायत समितीचे ६ गण असुन वंचित बहुजन आघाडी सर्व जागेवर उमेदवार उभे करून वंचित उपेक्षित समुहाने एकत्रित करून धारूर तालुक्यातील जनतेला सत्तेत



जाण्यासाठी उमेदवारांच्या माध्यमातुन पर्याय उभा करणार आहे.

२०२४ विधानसभेच्या निवडणुकीच्या नंतर राज्यात सर्वसामान्य जनतेच्या, शेतकऱ्यांची, वंचित, उपेक्षित आदिवासी, ओबीसी समुहाची बाजु मांडणारा एकही पक्ष राज्यात राहिलेला नाही. या सर्व समुहाची बाजु मांडणारा एकमेव पक्ष आणि एकमेव नेता राज्यात असेल तर आदरणीय बाळासाहेब आंबेडकर आहेत.या सर्व समुहाला एकत्रित करून वंचित बहुजन आघाडी धारूर तालुक्यात आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सामोर जाण्याची माहिती तालुकाध्यक्ष इंजी प्रशांत उघडे यांनी दिली.

# जामशेतमध्ये आमदार विनोद निकोले यांच्या स्वखर्चातून पथदिवे बसविण्याचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

पालघर मधील डहाणू तालुक्यातील जामशेत गावातील पाटिलपाडा येथील गावदेव आणि सतीमात परिसरात आमदार विनोद निकोले यांच्या स्वखर्चातून पथदिवे बसविण्यात आले, या उपक्रमामुळे गावात प्रकाशमान वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण आहे.आज दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी गावदेवाला सुरुवात होत असताना या शुभप्रसंगी पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले. यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना प्रकाशाच्या सुविधेमुळे सुरक्षित हालचालीस मोठी मदत होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या भागात रात्री अंधाराचे साम्राज्य असल्याने नागरिकांना प्रवास करताना अडचणी येत होत्या. विशेषतः महिला, विद्यार्थी व वयोवृद्धांना रात्रीच्या वेळी मार्गक्रमण करणे धोकादायक ठरत होते. आता पथदिवे बसवल्याने या समस्या दूर होणार आहेत.या उपक्रमाद्वारे आमदार विनोद निकोले यांनी ग्रामीण भागातील मूलभूत सोयीसुविधा सुधारण्याबाबत आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास गावाचे सरपंच विकास दौडा, उपसरपंच मोहन पडवले, माजी सरपंच अशोक धोडी, तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रामस्थांनी आमदार निकोले यांचे मनःपूर्वक आभार मानत सांगितले की, अशा प्रकारच्या उपक्रमामुळे आमच्या गावात विकासाची गती वाढेल. रात्रीच्या वेळी प्रकाशामुळे मुलांना अभ्यासासाठी, तर नागरिकांना प्रवासासाठीही सोय होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077